# -जाहिर प्रकटन-

अनधिकृत धार्मिक स्थळांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रं. 104/2010, सोसायटी फॉर फास्ट जस्टीस विरूध्द महाराष्ट्र शासन दाखल झाली होती. सदर न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि. 01 ऑक्टोंबर, 2016 रोजी झालेल्या सुनावणीअंती निर्देश देऊन सार्वजनिक मालमत्ता, रस्ते, फुटपात यांच्यावर कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम होणार नाही याची दक्षता घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. याबाबत मा.उच्च न्यायालयाने दि.01 ऑक्टोबर, 2016 रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्रं. 38 (m) व (n) येथे दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर (महसूल शाखा) येथे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात येत आहे.

तरी या जाहिर प्रकटनाव्दारे अहमदनगर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, सार्वजनिक मालमत्तेवर अथवा रस्ता किंवा फुटपाथ यावर उभारण्यात येत असलेल्या अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बांधकामाबाबत काही तक्रार अगर हरकत असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर (महसूल शाखा) येथे स्थापन करण्यात आलेल्या तक्रार निवारण कक्षाकडे लेखी स्वरुपात तक्रार दाखल करावी किंवा (0241) 2346028 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधुन तक्रार दाखल करावी.

स्थळः- अहमदनगर
दिनांकः-14/03/2017.

जिल्हाधिकारी
अहमदनगर

(अनिल कवडे)
जिल्हाधिकारी अहमदनगर.